आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
६ सप्टेंबर २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- गिधाडांचं यशस्वीपणे पुनर्वसन करणाऱ्या देशातल्या अव्वल वनक्षेत्रांमध्ये महाराष्ट्रातलं मेळघाट तसंच मध्य प्रदेशातल्या पेंच व्याघ्र प्रकल्पाचा समावेश

- मध्य प्रदेशात विषारी दारू पिऊन ११ जणांचा मृत्यू

- नेपाळमधल्या महापुरात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या १ हजार ३४४ वर, ५ हजार जण अद्याप बेपत्ता

**आणि**

- महिलांच्या आशिया चषक टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत भारताचा पाकिस्तानवर ७ गडी राखून विजय

**<><><><><>**

महाराष्ट्रात मेळघाट आणि पेंच व्याघ्र प्रकल्प ही गिधाडांचं यशस्वीपणे पुनर्वसन करणारी देशातली अव्वल वनक्षेत्र ठरली आहेत. डिसेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ दरम्यान दोन्ही अभयारण्यांमध्ये सोडण्यात आलेल्या २९ गिधाडांमध्ये ७८ टक्क्यांपर्यंत जगण्याचा दर नोंदवला गेल्याची माहिती बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीनं दिली आहे. यामुळे गिधाडांची संख्या वाढवण्यासाठी सुरु असलेल्या प्रयत्नांना बळ मिळणार असून, निसर्ग साखळीत महत्वाचा घटक असलेल्या या पक्षाचं भविष्य सुरक्षित होईल अशी आशा व्यक्त आहे.

**<><><><><>**

मध्य प्रदेशातल्या सागर जिल्ह्यात बांदा तालुक्यातल्या  दोन गावांमध्ये काल विषारी दारू प्यायल्यामुळे नऊ जणांचा मृत्यू झाला, तर २५ जण आजारी पडले. त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. बांदा तालुक्यात काल आणखी एका ठिकाणी विषारी दारू पिऊन २ जणांचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे. या प्रकरणाचा पोलीस तपास सुरु असल्याचं आमच्या वार्ताहरानं सांगितलं.

**<><><><><>**

मुंबईत काल दहीहंडीच्या उत्सवादरम्यान गोविंदा पथकातल्या एका अल्पवयीन मुलाचा मृत्यू झाला, तर ३७६ गोविंदा जखमी झाले. जखमींपैकी ५३ जणांना शहरातल्या विविध रुग्णालयांमध्ये दाखल केलं. त्यापैकी ३७ जण उपचार घेत असून, २८६ जणांना उपचारानंतर घरी सोडण्यात आल्याचं महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मुंबईच्या धारावी परिसरात काल रात्री एका खोलीत एलपीजी सिलेंडरने पेट घेऊन लागलेल्या आगीत ४ जण जखमी झाले. यात दोन अल्पवयीन मुलांचा समावेश आहे. अग्निशमन दलाच्या पथकानं आग आटोक्यात आणली. जखमींवर सायन रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

मुंबईत लॅमिंग्टन रोडवरच्या एका इमारतीतल्या गोदामातही काल रात्री आग लागली. अग्निशमन दलाने आगीवर नियंत्रण मिळवलं. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, अशी माहिती संबंधित सूत्रांनी दिली.

**<><><><><>**

नेपाळमधल्या महापुरात मृत्युमुखी पडलेल्यांचा आकडा १ हजार ३४४ वर पोहोचला आहे, तर सुमारे ५ हजार लोक अद्याप बेपत्ता आहेत. यामध्ये ५९० परदेशी नागरिकांचा समाविष्ट आहे. बचाव पथकांनी आतापर्यंत १३ हजारापेक्षा जास्त लोकांना वाचवलं आहे. मृत व्यक्तींची ओळख पटवण्यात अडचणी येत असून, यासाठी डीएनए चाचणीचा वापर केला जात आहे. पूरग्रस्त भागात बचावकार्य, मदत साहित्याचं वितरण, मृतदेहांची हाताळणी आणि रस्ते मोकळे करण्याच्या कामासाठी विविध संस्थांचे सुमारे ८ हजार कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

भारत आणि चीनच्या पथकांच्या साहाय्यानं विविध जलविद्युत प्रकल्पांच्या ठिकाणी बचावकार्य सुरू आहे. तसंच प्रमुख नद्यांच्या पाणी पातळीवरही संबंधित अधिकारी बारकाईने लक्ष ठेवत आहेत.

नेपाळ-तिबेट सीमा भागात २६ ऑगस्ट रोजी हिमनदीचा काही भाग कोसळल्यामुळे आलेल्या नैसर्गिक आपत्तीमध्ये प्रचंड हानी झाली आहे.

**<><><><><>**

दुबई इथे झालेल्या महिलांच्या आशिया चषक टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत काल भारताने पाकिस्तानचा सात गडी राखून पराभव केला. पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला. पण, त्यांचा संघ १८ षटकं आणि एका चेंडूत फक्त ५५ धावा काढून तंबूत परतला. आंतरराष्ट्रीय टी-ट्वेंटी क्रिकेट प्रकारातली ही त्यांची सर्वात कमी धावसंख्या आहे. श्री चरणी आणि प्रेमा रावत या दोघींनी प्रत्येकी तीन तर दीप्ती शर्मा हिने दोन गडी बाद केले. भारताने ३ गड्यांच्या मोबदल्यात अवघ्या ८ षटकं आणि ४ चेंडूत ५७ धावा करून सामना जिंकला. कर्णधार हरमनप्रीत कौर ही १८ धावांवर नाबाद राहिली. हा तिचा भारतीय कर्णधार म्हणून दीडशेवा टी-ट्वेंटी सामना होता. हा टप्पा गाठणारी ती पहिली आंतरराष्ट्रीय कर्णधार ठरली आहे.

<><><><>

चायना मास्टर्स सुपर सेव्हन फिफ्टी बॅडमिंटन स्पर्धेत भारताचा सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांचा अंतिम फेरीचा सामना आज चीनच्या जी टिंग आणि रेन शियांश यू यांच्याशी होणार आहे. उपांत्य फेरीत या जोडीने मलेशियाच्या नूर मोहम्मद अझरिन अयुब आणि टॅन वी किओंग यांचा २१-१५, १८-२१, २१-११ असा पराभव केला.

<><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज गोव्यात पश्चिम विभागीय परिषदेच्या २८व्या बैठकीचं अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. तसंच, ते गृहमंत्रालयाच्या बैठकीत सहभाग घेणार असून, त्यानंतर पत्रकार परिषदेलाही संबोधित करणार आहेत.

<><><><>

येत्या १२ आणि १३ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत आयोजित ब्रिक्स शिखर परिषदेत सदस्य देशांमधले ५०० पेक्षा जास्त संस्थात्मक गुंतवणूकदार, अर्थमंत्री आणि उद्योगपती सहभागी होत आहेत. ब्रिक्स सदस्य देश आणि भागीदार देशांमधलं भांडवल बँकेच्या मान्यताप्राप्त पायाभूत सुविधा, ऊर्जा आणि डिजिटल क्षमता प्रकल्पांशी जोडणं, हे या दोन दिवसीय परिषदेचं उद्दिष्ट आहे.

<><><><>

प्रधानमंत्री जनधन योजनेंतर्गत उघडण्यात आलेल्या सुमारे ५ कोटी ७२ लाख खात्यांमध्ये शून्य शिल्लक असल्याचं माहिती अधिकारांतर्गत उघडकीला आलं आहे.

अर्थमंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाने दाखल झालेल्या एका माहिती अधिकार अर्जाला दिलेल्या उत्तरात ही माहिती दिली आहे. यंदा १२ ऑगस्टपर्यंत या योजनेतल्या ५९ कोटींपेक्षा अधिक खात्यांमध्ये ३ लाख १५ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम जमा होती. शून्य शिल्लक असलेल्या सर्वाधिक खात्यांची संख्या उत्तर प्रदेशमध्ये असून त्यानंतर बिहार, पश्चिम बंगाल, आसाम आणि महाराष्ट्र यांचा क्रमांक लागतो. याशिवाय अनेक खाती वापरात नसल्याची माहितीही विभागाने दिली आहे. तसंच, १०० रुपयांपेक्षा कमी शिल्लक असलेली, गेल्या पाच वर्षांत बंद झालेली खाती आणि संशयास्पद व्यवहार किंवा सायबर फसवणुकीमुळे ब्लॉक अथवा गोठवलेली खाती यांविषयीची माहिती केंद्रीय स्तरावर ठेवली जात नसल्याचंही या माहितीत नमूद करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

राज्यात विविध मागण्यांसाठी रस्त्यांवर उतरून शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रत्येक मागणी न्याय्य असून सरकारनं त्यांचं म्हणणं ऐकून घ्यावं आणि तातडीनं योग्य ती पावलं उचलावीत, अशी मागणी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे केली आहे. हा प्रश्न एका परीक्षेचा किंवा भरती प्रक्रियेचा नाही, तर संपूर्ण यंत्रणेवरचा विद्यार्थ्यांचा विश्वास उडाला आहे, असं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

मुंबईत गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर १४ ते २५ सप्टेंबर दरम्यान मेट्रो लाइन ३ अर्थात ॲक्वा लाईनची सेवा मध्यरात्री १२ वाजेपर्यंत सुरू ठेवण्यात येणार आहे. सध्या कफ परेड आणि आरे जेव्हीएलआर या दोन्ही स्थानकांवरून शेवटची मेट्रो रात्री साडेदहा वाजता सुटते. या कालावधीत ती रात्री १२पर्यंत सुरू राहील. याशिवाय, ४५ सेंटीमीटरपर्यंतच्या गणेशमूर्ती मेट्रोमधून न्यायची परवानगीही देण्यात आली आहे.

**<><><><><>**

पश्चिम इराण इथं इंधनाच्या टँकरचा स्फोट होऊन ११ जणांचा मृत्यू झाला तर ७ जण जखमी झाले. इराणच्या सनांदाज इथं हा टँकर अनेक वाहनांना धडकल्यावर आग लागली आणि त्याचा स्फोट झाला. टँकरच्या ब्रेक यंत्रणेत बिघाड झाल्यानं हा अपघात झाल्याचं वृत्त आहे.

**<><><><><>**

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी काल क्रेमलिनमध्ये अमेरिकेचे राजदूत स्टीव्ह विटकॉफ आणि जेरेड कुशनर यांची भेट घेतली. रशिया-युक्रेन संघर्ष संपवण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या वाटाघाटींना पुन्हा गती देण्याच्या अमेरिकेच्या प्रयत्नांचा हा भाग आहे. शांतता प्रक्रियेचा भाग म्हणून युक्रेनची राजधानी कीव इथं अमेरिकी राजदूतांची ही पहिलीच भेट आहे.

रशिया आणि युक्रेन यांच्यात सुरू असलेल्या हवाई हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर ही बैठक झाली. चर्चेदरम्यान, पुतिन यांनी युक्रेनवरचे रशियन हल्ले तीन दिवस थांबवण्याचे आदेश दिले, तर येत्या सोमवार पर्यंत मॉस्कोवरचे हल्ले थांबवण्याची आपली तयारी असल्याचं युक्रेनचे अध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांनी सांगितलं.

//<><><><><>//